‘कोपा’साठी आता ड्रीम फायनल

जेतेपदासाठी ब्राझील-अर्जेंटिना रविवारी भिडणार

आम्हाला गोलकीपर एमिलियानोवर विश्वास होता. आमचे लक्ष्य स्पर्धेतील सर्व सामने खेळणे, हेच होते. आता फायनल जिंकण्याचा प्रयत्न करू.
- लियोनेल मेस्सी

- अर्जेंटिना-कोलंबिया निर्धारित, अतिरिक्त वेळेत १-१ ने बरोबरीत
- पेनल्टी शूटआऊटमध्ये मेस्सीच्या अर्जेंटिनाची ३-२ ने बाजी

ब्रासिलीया (ब्राझील) : वृत्तसंस्था

कोपा अमेरिका चषक फुटबॉल स्पर्धेत रविवारी ब्राझील आणि अर्जेंटिना या दोन बलाढ्य संघांमध्ये जेतेपदासाठी ‘ड्रीम फायनल’ रंगणार आहे. रियो दी जनेरियोच्या ऐतिहासिक माराकाना स्टेडियममध्ये होणाऱ्या या सामन्याच्या निमित्ताने मेस्सीची अर्जेंटिना आणि नेमारचा ब्राझील संघ एकमेकांविरुद्ध भिडणार असल्याने जगातील तमाम फुटबॉल चाहत्यांना जणू चुरशीच्या लढतीची मेजवानीच चाखावयास मिळणार आहे.



दुसऱ्या सेमीफायनलमध्ये अर्जेंटिनाने पेनल्टी शूटआऊटमध्ये कोलंबियावर ३-२ असा विजय मिळवत फायनलमध्ये धडक मारली. गोलकीपर एमिलियानो मार्टिनेज याने कोलंबियाचे तीन पेनल्टी शॉट रोखत अर्जेंटिनाला फायनलमध्ये प्रवेश मिळवून दिला. नियमित वेळेत हा सामना १-१ असा बरोबरीत होता. सातव्या मिनिटाला लॉटेरो मार्टिनेजने गोल करून अर्जेंटिनाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. मात्र, कोलंबियाच्या लुई डियाजने ६१ व्या मिनिटाला गोल करीत सामना १-१ असा बरोबरीत आणला.

अर्जेंटिनाचा गोलकीपर मार्टिनेजने शूटआऊटमध्ये कोलंबियाच्या सांचेज, येरी मायना आणि एडविन कारडोना यांचे शॉट रोखले. अर्जेंटिनाकडून रॉड्रिगो-डी-पॉल याला गोल करता आला नाही. मात्र, मेस्सी, लिएंड्रो पारेडेज आणि लॉटेरो मार्टिनेज यांनी गोल मारत संघाचा विजय निश्चित केला. कोलंबियाकडून कुआड्रेडो आणि मिगुएल बोर्जा यांनी गोल केले. अर्जेंटिनाने १९९३ मध्ये कोपा अमेरिका चषक जिंकल्यानंतर कोणतीही मोठी स्पर्धा जिंकलेली नाही. ब्राझीलने पेरूविरुद्ध १-० असा विजय मिळवत अंतिम फेरी गाठली होती. ब्राझीलने मायदेशात कधीही कोपा अमेरिका फायनल सामना गमावलेला नाही.



जोरदार पुनरागमन करेन : हिमा दास

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

भारताची आघाडीची धावपटू हिमा दासला दुखापतीमुळे टोकियो ऑलिम्पिकमध्ये स्थान मिळवता आले नाही. मात्र, पुढील वर्षी जोरदार पुनरागमन करेन, असा विश्वास हिमाने व्यक्त केला. भारतीय ॲथलेटिक्समधील प्रतिभावंत खेळाडूंपैकी एक असलेल्या हिमाला गेल्या महिन्यात राष्ट्रीय आंतरराज्य ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये १०० मीटर स्पर्धेत सहभाग नोंदविताना दुखापत झाली होती. दुखापतीमुळे या २१ वर्षीय खेळाडूला १०० मीटर आणि ४ बाय ४०० मीटरच्या फायनल्समधून माघार घ्यावी लागली.

पेडणे : टीका उत्सवात बोलताना केंद्रीय मंत्री श्रीपाद नाईक. सोबत सुभाष धारगळकर, तुळशीदास गावस, भूषण नाईक, सज्जन कोनाडकर, प्रमोद साळगावकर व इतर. (छाया : निवृत्ती शिरोडकर)

आयुष इस्पितळाचा पहिला टप्पा आठ महिन्यांत पूर्णत्वास

केंद्रीय आयुषमंत्री श्रीपाद नाईक यांचे प्रतिपादन

पेडणे : पुढारी वृत्तसेवा

सुकेकुळण-धारगळ येथे आयुष इस्पितळाचे पहिल्या टप्प्याचे काम येणाऱ्या आठ महिन्यांत पूर्ण होणार आहे. सुमारे पाचशे कोटी रुपये खर्च करून उभारण्यात येणाऱ्या या प्रकल्पावर ८० टक्के गोव्यातील नागरिकांना नोकऱ्यांमध्ये प्राधान्य देण्यात येईल. कोरोनाच्या संकटावर मात करण्यासाठी सरकारने आणि आरोग्य खात्याने सर्वतोपरी प्रयत्न जोमाने सुरू केले असून येणाऱ्या काळात यावर नियंत्रण मिळणार आहे. सर्वांनी कोरोना लस घेऊन आपले आरोग्य सांभाळावे, असे आवाहन केंद्रीय मंत्री श्रीपाद नाईक यांनी केले.

सुकेकुळण-धारगळ येथे आयुष इस्पितळाचे प्रकल्पाचे काम करत असलेले सुमारे साडे पाचशे कर्मचाऱ्यांना कोरोनाची पहिली लस घेण्याच्या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी केंद्रीय मंत्री नाईक बोलत होते. यावेळी धारगळ पंचायतीचे सरपंच सुभाष धारगळकर, भाजप मंडळ अध्यक्ष तुळशीदास गावस, पंच भूषण नाईक, माजी पंच सज्जन कोनाडकर, प्रमोद साळगावकर आदी उपस्थित होते. केंद्रीय मंत्री नाईक म्हणाले की, कोरोनाच्या महामारीत कोणालाही त्रास होऊ नये, याची काळजी घेण्यासाठी आरोग्य खाते आणि आयुष मंत्रालयातर्फे हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

सुमारे आठ महिन्यांत या इस्पितळ प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे काम पूर्णत्वास येणार असून या प्रकल्पावर सर्वप्रथम ओपीडी, शंभर खाटांचे इस्पितळ तसेच पदव्युत्तर शिक्षण तसेच आरोग्य पर्यटन याला चालना देण्यासाठी आणि त्या दृष्टीने या ठिकाणी काम हाती घेण्यात येणार आहे. हा प्रकल्प लवकर पूर्ण करण्याचा केंद्र सरकारचा आणि आयुष विभागाचा मानस असल्याचे केंद्रीय मंत्री नाईक यांनी सांगितले.

स्थानिकांना रोजगार द्या-गावस

यावेळी धारगळचे पंच भूषण नाईक, पेडणे भाजप मंडळाचे अध्यक्ष तुळशीदास गावस यांनी केंद्रीय मंत्री नाईक यांना प्रकल्पावर स्थानिकांना कोणत्याच प्रकारचे रोजगार कंपनीने रोजगार दिला नसल्याचे निदर्शनास आणून दिले. त्यावर केंद्रीय मंत्री श्रीपाद नाईक यांनी सांगितले की, याप्रश्नी आठवडाभरात अधिकाऱ्यांशी चर्चा करून स्थानिकांना प्राधान्यक्रमाने नोकऱ्या देण्यावर आपण भर देणार असल्याचे सांगितले.

जखमी शुभमन मायदेशी परतणार

नवी दिल्ली : वृत्तसंस्था



सध्या इंग्लंड दौऱ्यावर असलेला जखमी सलामी फलंदाज शुभमन गिल याला मायदेशी माघारी बोलावण्यात आले आहे. मात्र, इंग्लंडविरुद्ध येत्या ४ ऑगस्टपासून कसोटी मालिकेसाठी शुभमनच्या स्थानी कोण खेळणार? याचा खुलासा बीसीसीआयने अद्याप केलेला नाही. दरम्यान, संघ व्यवस्थापनाने यापूर्वी स्पष्ट केले आहे की, के. एल. राहुलकडे सलामी फलंदाज म्हणून पाहण्यात येणार नाही. यामुळे मयंक अग्रवाल सध्या सलामी फलंदाज म्हणून खेळण्याची प्रतीक्षा करत आहे. रोहितसोबत अभिमन्यू ईश्वरनला सलामीला उतरवणे हा एक पर्याय बाकी आहे.

इटली अंतिम फेरीत

पेनल्टी शूटआऊटमध्ये स्पेनवर ४-२ गोलने मात

लंडन : वृत्तसंस्था

शेवटच्या क्षणापर्यंत श्वास रोखून धरावयास लावणाऱ्या युरो चषक फुटबॉल स्पर्धेच्या पहिल्या सेमीफायनलमध्ये इटलीने पेनल्टी शूटआऊटमध्ये स्पेनचा ४-२ ने धुव्वा उडवून फायनलमध्ये धडक मारली आहे. आता जेतेपदासाठी इटलीची गाठ इंग्लंड आणि डेन्मार्क यांच्यातील विजेत्याशी रविवारी रात्री १२.३० वा. पडणार आहे.



इटलीने ९ वर्षांनंतर फायनलमध्ये प्रवेश केला आहे. २०१२ मध्ये इटलीला स्पेनकडून फायनलमध्ये पराभूत व्हावे लागले होते.

पहिल्या सेमीफायनलमध्ये इटली आणि स्पेन यांच्यातील लढत निर्धारित वेळेत १-१ अशी बरोबरीत राहिली. यामुळे सामन्याचा निकाल पेनल्टी शूटआऊटवर घेण्यात आला. इटलीच्या वतीने फेडरिका किएसाने ६० व्या मिनिटाला गोल करून संघाला आघाडी मिळवून दिली. मात्र, स्पेनच्या अल्वेरो मोराता याने ८० व्या मिनिटाला शानदार गोल करून संघाला १-१ अशी बरोबरी साधून दिली. मात्र, पेनल्टी शूटआऊटमध्ये अल्वेरो गोल करू शकला नाही आणि स्पेनचे आव्हान सेमीफायनलमध्येच संपुष्टात आले.

निर्धारित आणि अतिरिक्त वेळेत गोलफलक १-१ असा बरोबरीत राहिला. यामुळे पेनल्टी शूटआऊटचा थरार रंगला. यामध्ये इटलीने ४-२ अशी बाजी मारत फायनलमधील स्थान निश्चित केले. इटलीच्या वतीने बेलोत्ती, बोनुच्ची, बर्नार्डेस्की आणि जॉर्जिन्हो यांनी गोल नोंदविले. तर, स्पेनच्या वतीने जेरार्ड मोरेनो व टिएगो अलाकांत्रा यांनी गोल केले. तर, ओल्मो व मोराता हे गोल करण्यात अपयशी ठरले.

वास्कोत रात्री उशिरापर्यंत दुकाने सुरू

वास्को : पुढारी वृत्तसेवा

राज्यात सायंकाळी सहा वाजेपर्यंत दुकाने उघडी ठेवण्याची मुभा दिली असली, तरी येथील शहर व इतर परिसरातील काही दुकाने रात्री नऊ वाजेपर्यंत उघडी ठेवण्यात येतात. नियमबाह्य दुकाने सुरू ठेवणाऱ्यांविरोधात प्रशासन कोणतीही कारवाई करीत नसल्याने संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करण्यात येत आहेत.

कोविडची दुसरी लाट ओसरत चालल्याने राज्यातील संचारबंदीत शिथीलता आणण्यात आली आहे. त्यानुसार दुकाने सकाळी सात ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत उघडी ठेवण्यास मुभा देण्यात आली आहे. परंतु, येथील काही दुकानदार आपला व्यवहार रात्री नऊ सुरू ठेवत आहेत. रात्री उशिरापर्यंत दुकाने सुरू ठेवणाऱ्यांविरोधात कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

आयबीसी २०१६ अंतर्गत टॅग ऑफशोअर लिमिटेड (अवसायनातील) यांच्या ई - लिलाव विक्रीची सूचना

टॅग ऑफशोअर लिमिटेड (टॅग) ही कंपनी सध्या इंसॉल्व्हन्सी आणि बँकरप्सी कोड २०१६ (आयबीसी) मधील तरतुदीनुसार अवसायन प्रक्रियेतून जात असून माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा लवाद, मुंबई यांच्या आदेश दिनांकीत २६ सप्टेंबर २०१९ अनुसार श्री सुदीप भट्टाचार्य यांची अवसायक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. याद्वारे टॅग ऑफशोअर लिमिटेड (अवसायनातील) यांच्या मालमत्तांच्या जसे आहे तिथे आहे तत्वावर, जसे आहे तसे आहे तत्वावर तसेच जे आहे ते आहे तत्वावर इलेक्ट्रॉनिक लिलाव विक्री प्रक्रियेच्या माध्यमातून खरेदीसाठी इच्छुक बोलीदारांकडून स्वारस्याची अभिव्यक्ती आमंत्रित केली जात आहे. सदरील प्रक्रिया आयबीसी आणि इओआय प्रक्रिया प्रपत्रात नमूद केलेल्या अटी आणि शर्तीनुसार होणार आहे आणि ते www.tagoffshore.in येथे पाहता येऊ शकेल.

विक्रीसाठी ठेवण्यात आलेल्या मालमत्ता यांचा तपशील, ज्या टॅग ऑफशोअर लिमिटेड (अवसायनातील) यांच्या अवसायनातील मालमत्तांचा भाग आहे, ज्या अवसायक यांनी निर्धारित केल्या आहेत आणि ज्या अवसायकांची नियुक्ती माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा लवाद, मुंबई यांच्या आदेश दिनांकित २६ सप्टेंबर २०१९ च्या अनुसार करण्यात आली आहे.

विक्री प्रक्रिया ही निम्नस्वाक्षरीकार यांच्याकडून ई - लिलाव व्यासपीठाच्या माध्यमातून घेण्यात येईल.

ब्लॉक - १

नौकेचे नाव	आयएमओ क्रमांक	बांधणीचे वर्ष	नौकेचा तपशील	नांगरून ठेवलेले ठिकाण	राखीव किंमत
टॅग ममता	९३७१८८०	२००५	हार्बर टग	जवाहरलाल नेहरू पोर्ट	२८,५७,१३, ०००
टॅग राजवीर	९६०३५८२	२०१०	हार्बर टग	मुंबई पोर्ट	
टॅग लक्ष्मी	९६१९३५९	२०११	हार्बर टग	मुंबई पोर्ट	
टॅग १०	९४७४४७४	२०१०	अँकर हँडलिंग टोईंग आणि सप्लाय व्हेसल	मुंबई पोर्ट	

ब्लॉक - २

नौकेचे नाव	आयएमओ क्रमांक	बांधणीचे वर्ष	नौकेचा तपशील	नांगरून ठेवलेले ठिकाण	राखीव किंमत
टॅग ५	९३७८९९३	२००९	अँकर हँडलिंग टोईंग आणि सप्लाय व्हेसल	जयगड पोर्ट	१५,४५,६१,०००
टॅग सिया	९४१२२५६	२००६	हार्बर टग	जवाहरलाल नेहरू पोर्ट	
टॅग शिव	९४१२२६८	२००६	हार्बर टग	मोर्मुगाव पोर्ट	

ब्लॉक - ३

नौकेचे नाव	आयएमओ क्रमांक	बांधणीचे वर्ष	नौकेचा तपशील	नांगरून ठेवलेले ठिकाण	राखीव किंमत
टॅग १२	९६३०४५६	२०१०	अँकर हँडलिंग टोईंग आणि सप्लाय व्हेसल	मुंबई पी अँड व्ही	९,७४,७३,०००

ब्लॉक - ४

नौकेचे नाव	आयएमओ क्रमांक	बांधणीचे वर्ष	नौकेचा तपशील	नांगरून ठेवलेले ठिकाण	राखीव किंमत
टॅग ४	९४२८५५४	२००९	अँकर हँडलिंग टोईंग आणि सप्लाय व्हेसल	जयगड पोर्ट	४७,८१,६९,०००
टॅग ८	९५४९५५४	२००९	प्लॅटफॉर्म सप्लाय व्हेसल	मोर्मुगाव पोर्ट	
टॅग ९	९४२८५९२	२०१०	अँकर हँडलिंग टोईंग आणि सप्लाय व्हेसल	मुंबई पी अँड व्ही	
टॅग १३	९६८०८२७	२०१४	अँकर हँडलिंग टोईंग आणि सप्लाय व्हेसल	मुंबई पी अँड व्ही	
टॅग १४	९६९८४४६	२०१४	प्लॅटफॉर्म सप्लाय व्हेसल	मुंबई पी अँड व्ही	

ब्लॉक - ५

नौकेचे नाव	आयएमओ क्रमांक	बांधणीचे वर्ष	नौकेचा तपशील	नांगरून ठेवलेले ठिकाण	राखीव किंमत
टॅग ६	९६४१७१६	२०१२	फायर फायटिंग व्हेसल (फिफि २)	मुंबई पी अँड व्ही	११,१७,८३,५००

ई - लिलावाच्या अटी आणि शर्ती खालीलप्रमाणे आहेत :

१) ई - लिलाव विक्री प्रक्रिया जसे आहे जिथे आहे, जसे आहे जे आहे जे आहे ते आहे आणि नो रिसोर्स बेसिस तत्वावर आणि मान्यताप्राप्त सेवा पुरवठादार www.eauctions.co.in यांच्या माध्यमातून घेण्यात येईल.

२) ई - लिलाव विक्रीची तारीख ही २७ जुलै २०२१ आणि वेळ दुपारी ३. ०० ते ५. ०० (प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्यादित वाढाव्यासह आणि किमान वाढीव बोली रु १०,००,०००/- (रुपये दहा लाख मात्र) सह घेण्यात येईल.

३) बोलीदार यांना प्रत्येक ब्लॉक साठी सर्व नौकांकरिता बोली लावणे आवश्यक आहे. एखाद्या विशिष्ट नौकेसाठी बोली लावण्यास परवानगी असणार नाही. बोलीदार अनेक ब्लॉक्स साठी बोली लावू शकतात.

४) संपूर्ण ई - लिलाव प्रक्रिया प्रपत्र ज्यात मालमत्तांचा तपशील, अर्ज, घोषणापत्र आणि प्रतिज्ञापत्र नमुना, ऑनलाईन ई - लिलाव विक्रीच्या सामान्य अटी आणि शर्ती उपलब्ध आहे ते www.tagoffshore.in येथे उपलब्ध आहे.

५) इच्छुक बोलीदार यांनी स्वारस्याची अभिव्यक्ती अर्ज, पात्रतेची आवश्यक ती कागदपत्रे, प्रतिज्ञापत्र आणि विनापरतावा अनामत रक्कम रुपये २०,०००/- (रुपये वीस हजार मात्र) आदींसह १२ जुलै २०२१ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. स्वारस्याची अभिव्यक्ती करिता विस्तृत अर्ज आणि घोषणापत्र www.tagoffshore.in येथे उपलब्ध आहे.

६) इच्छुक बोलीदार यांनी आपली बोली सादर करण्यापूर्वी नौकांसंदर्भात स्वतंत्र चौकशी करणे आणि त्यांची पाहणी करणे आवश्यक आहे.

७) इच्छुक बोलीदारना प्रत्यक्ष साईटवर संबंधित नौकांची प्रत्यक्ष चाचणी आणि पाहणी करण्यासाठी आपली केवायसी / संपर्क क्रमांक ईमेलच्या माध्यमातून सादर केल्यानंतर, किंवा अवसायक यांच्याशी संपर्क साधल्यानंतर पूर्वपरवानगी आवश्यक असेल. पाहणीची अंतिम तारीख २२ जुलै २०२१.

८.) इच्छुक बोलीदार यांना इसारा रक्कम एनईएफटी/आरटीजीएस यांच्या माध्यमातून टॅग ऑफशोअर लिमिटेड अवसायनातील यांच्या बँक खात्यात भरणा करणे आवश्यक आहे. खाते क्रमांकाचा तपशील इ लिलाव प्रक्रिया प्रपत्रात विस्ताराने देण्यात आला आहे.

९) इच्छुक बोलीदार यांनी इसारा रक्कम रु २०,००,००,००० /- (रुपये वीस कोटी) भरणा केल्याचा पुरावा सादर करणे आवश्यक आहे. संकेतस्थळ www.tagoffshore.in येथे देण्यात आलेल्या परिशिष्टाप्रमाणे आणि २३ जुलै २०२१ रोजी संध्याकाळी ५.०० वाजण्यापूर्वी. प्रत्यक्ष प्रति स्पीड पोस्ट/रजिस्टर्ड पोस्ट यांच्या माध्यमातून अवसायक यांना खालीलप्रमाणे नमूद केलेल्या पत्त्यावर सादर करणे आवश्यक आहे. अवसायक यांनी आमंत्रित केल्यानंतर मूळ प्रति सादर करणे आवश्यक आहे.

१०) ई - लिलाव प्रक्रियेत सहभाग घेण्यासाठी पात्र बोलीदार यांची नावे अवसायक यांच्याकडून निश्चित करण्यात येतील आणि त्यांची माहिती ईमेलच्या माध्यमातून कळविण्यात येतील. इ लिलाव प्रक्रियेत सहभाग घेणारे बोलीदार चाचणीसाठी ई - लिलाव सेवा पुरवठादारांशी संपर्क साधू शकतात. पात्र बोलीदारांना युजर आयडी आणि पासवर्ड ईमेलच्या माध्यमातून कळविण्यात येईल.

११.) जर ई - लिलाव विक्री प्रक्रिया संपुष्टात येण्यापूर्वी ५ मिनिटे आधी बोली सादर करण्यात आली तर लिलाव बंद होण्याची वेळ आपोआप ५ मिनिटांनी वाढविण्यात येईल आणि त्याचा वाढावा अमर्यादित राहील. जो बोलीदार सर्वोच्च बोली सादर करील (राखीव किमतीपेक्षा कमी नाही) त्याला यशस्वी बोलीदार म्हणून जाहीर करण्यात येईल आणि त्यासंदर्भातील माहिती इलेक्ट्रॉनिक माध्यमातून देण्यात येईल आणि ते अवसायक यांच्या मान्यतेस अधीन राहील.

सुदीप भट्टाचार्य
अवसायक, टॅग ऑफशोअर लिमिटेड
आयबीबीआय नोंदणी क्रमांक : आयबीबीआय/आयपीए -००३/आयपी - एन ०००८० /२०१७- १८/१०७०३
प्रक्रिया संबंधित पत्ता : सी/ओ डफ अँड फेल्प्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, १४ वा मजला, रहेजा टॉवर्स, बीकेसी, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
नोंदणीकृत पत्ता : ९०३, क्वीन्स गेट सीएचएस, हिरानंदानी इस्टेट, घोडबंदर रोड समोर, ठाणे - पश्चिम, मुंबई ४०० ६०७
ई-मेल तपशील : liquidator.tagoffshore@duffandphelps.com
आयबीबीआय नोंदणीकृत ई-मेल तपशील : resolutionsudip@gmail.com
दिनांक : ०८/०७/२०२१

पुढारी Classified is Now Simplified... छोजा फक्त एका क्लिकवर Click classified.pudhari.news

पाहिजेत

घरी बसून मोबाईल द्वारा रजिस्टर्ड काम करण्यासाठी मुले/ मुलींची आवश्यकता आहे. कॉल- ९७१३५४१९३९.

एमएलएम लिडर्सची चिंता संपली, भारतात प्रथमच १००% ऑरगॅनिक ॲग्री एनपीके खते, टॉनिक, कीटकनाशक, हेल्थ युनिक प्रॉडक्ट्, युनिक प्लॅन , जॉइनिंग १६०० रू. बायनेरी ५०० रू. रीपरचेस बायनेरी, अवॉर्ड ॲण्ड रिवॉर्ड, होम डेपो कमिशन. महिना ११ लाख रु.कमवा फुल सपोर्ट. मो- ९९५६७३०८०८ / ९९३५३१०४०४

नवीन पनवेल मुंबईमध्ये फार्म हाऊसवर जेवण बनवण्यासाठी कुक पगार ८०००/- आणि फार्म कामासाठी अनुभवी जोडपे पगार १५०००/- पहिजेत. राहण्याची सोय संपर्क - ८८७९८६३९८१.

व्यवसाय

“वर्क फ्रॉम होम” एलईडी लाईटिंग आणि इलेक्ट्रिकल प्रॉडक्ट्चे प्रत्येक जिल्ह्यामध्ये डिलरशीप आणि एजन्सी देणे आहे. सुर्या कं., पुणे. ९१६८७५३५७८, ७०२८७६८०४८.

घरी राहून ऑनलाईन काम व्यवसाय करा. माहितीसाठी व्हॉट्सॲपवर मेसेज करा. मो. ८००७२४७८७८.

कपड्यांचे दोन डिसेंट शोरूम असणाऱ्या व्यावसायिकास होलसेल युनिटसाठी १० लाख गुंतवणूक करणारा स्लिपिंग पार्टनर पाहिजे. सुरक्षित करारासह महिना ५००००/- प्रॉफिट देवू. ९१५६९१०५०८.

विवाह

वर पाहिजे. शिक्षण बीएससी, प्राइवेट जॉब, पगार ३४०००, जात- मराठा, वडील नाही, वय २८. वयाची, जातीची, शिक्षणाची अट नाही. ७०२८६३९९१३, ८४४६५१९९१३.

वर पाहिजे वधु २८, उंची ५.४ शिक्षण १२वी ब्युटीपार्लर मासिक वेतन १२०००/- शेती ५ एकर. मुलगी अनाथ आहे. सर्व जाती मान्य. शिक्षणाची अट नाही. सुयोग्य वर पाहिजे. ८६२५९०६४७०, ८८६२००२७२०.

वधु वय २८ उंची ५.३ शिक्षण १०वी ब्युटीपार्लर शिवणकाम प्रतिमहीना ९०००/- मो. ९५२७८००४९७, ९१५६२३७६९५.

वैद्यकीय

डायबीटजची चिंता मिटली ३ मिनिटांत फायद्याची सुरूवात स्वादुपिंडामध्ये नैसर्गिकरित्या इन्सुलिनचे प्रमाण वाढविते सर्व वयोगटासाठी १००% आयुवैदिक ‘पॅनक्रीया पावर’’ लिक्वीड. ९८५००००९२९.

व्यसनमुक्ती

नशामुक्ती केंद्र- डॉ.पालवे (कॉल/ व्हॉट्सॲप करा- ९५५२६१९७५२) (दारू, अंमली पदार्थ... राम राम करा...) ५०१% रिझल्ट.

वाचकांसाठी निवेदन

पुढारी वर्तमानपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करूनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे याची पुढारी पब्लिकेशन्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी पुढारी पब्लिकेशन्स प्रा. लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

‘मनोरंजन गाव’ प्रकल्पाला विरोध नको

उपमुख्यमंत्री बाबू आजगावकर यांचे आवाहन

BEFORE THE MAMLATDAR/JT. MAMLATDAR OF SALCETE AT MARGAO GOA

Case No. MUTATION/84716/Betalbatim/2021
Telma Lizete Anjo De Guarda Godinho
R/o H.No. 74-B, Nagwado
Betalbatim, Salcete- Goa .... Applicants
V/s
1 Remedios Xavier De Paulo Godinho
2 Rosa Maria Maurina Do Rosario Godinho
3 Antonio Alexandre Godinho
4 Bijande do Romeu Lourdes Godinho
5 Bijou De Romeu Lourdes Godinho
6 Filip Goes ....Respondents
To,
The above named respondents/legal heirs,

PUBLIC NOTICE

WHEREAS, the above named applicant vide application dated 11/01/2021 filed u/s 96 of the land Revenue code, 1968 has requested to include her name in the occupant column as occupant after deleting the name of Bijande do Romeu Lourdes Godinho from the occupant column of the property surveyed under survey No.71/1 of village Betalbatim of Saleete Taluka by virtue of Deed of Will 26/09/1989 of Will Book No. 165 registered in the office of the Notary Public ExOrficio Salcete Goa.

WHEREAS, The notices in Form X was send to all the interested parties by registered A.D., however some of the notices could not be served and returned unserved to the sender with postal remark expired, incomplete address, house locked, not known, insufficient address and party out of station etc.

AND WHEREAS, the aforesaid applicant by application dated 06/07/2021 as prayed for substitute service by means of publication in the Local Daily newspaper under order V rule 20 (1A) of the C.P.C. 1908. As the applicant has submitted that they are not aware about the correct addresses of the respondents/their heirs if any for effecting personal service of the notice and prayed to serve notice by way of publication in the local newspaper. Whereas I am satisfied that this is a fit case for such a publication

NOW THEREFORE, all the interested parties are hereby given notice of the said mutation entry and called upon to file their objection if any to the mutation entry in the office of Mamlatdar/Jt. Mamlatdar of Salcete within fifteen days from the date of publication of this notice along with marterial/documentary evidence on which you rely upon in person or through authorized agent, failing which deem fit action under relevant provision of the Goa, Daman & Diu Land Revenue code, 1968 will be taken in your absence.

Given under my hand & Seal on this 07th Day July 2021.

-Sd/-
Seal
Mamlatdar/Jt. Mamlatdar of Salcete
Margao, Goa

कोरगाव : पुढारी वृत्तसेवा



मांद्रे येथे होणारा मनोरंजन गाव हा प्रकल्प पर्यावरण राखून उभारण्यात येणार आहे. त्यामुळे या प्रकल्पाला कुणी विरोध करू नये, असे आवाहन उपमुख्यमंत्री तथा पर्यटनमंत्री बाबू आजगावकर यांनी पत्रकारांशी बोलताना केले.

उपमुख्यमंत्री आजगावकर म्हणाले की, हा प्रकल्प देशातील मोठा प्रकल्प आहे. त्यात मांद्रे व पेडणे तालुक्यातील लोकांना रोजगाराच्या मोठ्या संधी असतील. या प्रकल्पामुळे मांद्रे, पेडणे तालुक्याचे नाव जगभर होणार आहे. या प्रकल्पामुळे स्थानिकांना कोणताही त्रास होणार नाही. पेडणे तालुक्यातील किनारी भागात एकही पंचतारांकीत हॉटेल नाही. आमदार तथा गोवा पर्यटन महामंडळाचे चेअरमन दयानंद सोपटे हे हा प्रकल्प लोकांना विश्वासात घेऊन मार्गी लावतील. गोवा आम्हाला पुढे न्यायाचे आहे. रोजगार मिळण्यासाठी व विकासासाठी आम्ही मोपा विमानतळ आणला. त्याचा फायदा स्थानिकांना होणार असल्याचे आजगावकर म्हणाले.

ताराबाई मळीक यांचे निधन



डिचोली : लाडफे डिचोली येथील ताराबाई नरहरी मळीक (वय ९०) यांचे अल्पशः आजाराने बुधवारी (७ जुलै) रोजी निधन झाले. निवृत्त पोलिस अधिकारी विष्णूदादा, पुरुषोत्तम, प्रवीण यांच्या त्या मातोश्री होत.

गोवा सरकार
सार्वजनिक बांधकाम खाते
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, कार्य विभाग XVI मध्य इमारत, फोंडा-गोवा

निविदा सूचना क्र. साबांखा/कावि XVI/बीसी/टीएस/०७/२०२१-२०२२
दिनांक : ०७,/०७/२०२१

(फक्त इ-निविदा प्रणालीने)

१) ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम तारिख : १९/०७/२०२१ रोजी दु. १.०० वा. पर्यंत.
२) ऑनलाईन निविदा सादर करण्याची अंतिम तारिख १९/०७/२०२१ रोजी दु.३.०० वा. पर्यंत
३) ऑनलाईन निविदा उघडण्याची अंतिम तारिख आणि वेळ: २०/०७/२०२१ रोजी स. १०.०० वा.नंतर.

अधिक तपशीलासाठी कार्यकारी अभियंता, कार्यविभाग XVI (BC), साबांखा, फोंडा-गोवा यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा किंवा https://goaenivida.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या.
ProductGOA/PublicDash

डीआय/जाहिरात/४६४/२०२१

गोवा सरकार
सार्वजनिक बांधकाम खाते
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, कार्य विभाग XXIII (मार्ग), साबांखा, डिचोली-गोवा

निविदा सूचना क्र. साबांखा/कावि XXIII/एएसडब्ल्यू/२१-२२/एफ१०/०६
दिनांक : ०५/०७/२०२१

१) ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम तारिख : १९/०७/२०२१ रोजी दु. १.०० वा. पर्यंत.
२) ऑनलाईन निविदा सादर करण्याची अंतिम तारिख १९/०७/२०२१ रोजी दु.३.०० वा. पर्यंत
३) ऑनलाईन निविदा उघडण्याची अंतिम तारिख आणि वेळ: २२/०७/२०२१ रोजी स. १०.३० वा.नंतर.

अधिक तपशीलासाठी कार्यकारी अभियंता, कार्यविभाग XXIII, साबांखा, डिचोली-गोवा यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा किंवा https://goaenivida.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या.

डीआय/जाहिरात/४५६/२०२१

शब्दकोडे क्रमांक १३२२



आडवे शब्द : १) विदेशी वस्तूंवर बहिष्कार टाकण्याचे आंदोलन ५) धूर्त रणनीती, कट ७) रेल्वे स्थानकांवर प्रवाशांच्या बॅगा आणि अन्य सामान उचलणारे ८) बेचव ९) भारताच्या एका माजी सरन्यायाधीशांचे आडनाव १०) शक्ती ११) भारताचा राष्ट्रीय पक्षी १३)... झोपणे (शांत झोपणे) १५) भयावह १६) रौद्ररूप, रुद्रावतार, भीषण हानी १७) ध्येय १८) चहा–कॉफी नेण्यासाठी वापरले जाणारे साधन १९) पोळणे.

उभे शब्द : १) बंधनमुक्त, पारतंत्र्यात नसलेला २) मुस्लिम धर्मीयांमध्ये बनवला जाणारा एक गोड पदार्थ ३) मित्र ४) असंमती, होकारच्या विरुद्ध ६) गायीचे पिल्लू ८) भारतात आढळणारी कुरंग कुळातील एक हरीण ९) आशीर्वाद, नवरा ११) बैलांच्या साहाय्याने विहिरीतील पाणी शेतीला देण्याची पद्धत १२) खूप, अधिक, तीव्र १४) टोलवाटोलवी करणे, उरकणे १५) फारसे न बोलणारा.

शब्दकोडे क्रमांक १३२१ चे उत्तर : आडवे शब्द : १) अपमान ६) टर ७) उशाप ८) पालवी १०) साद ११) जरासंध १४) चमचा १५) मग १६) रीघ १८) तरू २०) ईद २२) मेंढी २३) स्वार्थी. **उभे शब्द** : १) अटळ २) पर ३) नकुल ४) चिऊ ५) अपराध ८) पादचारी ९) वीज १०) साम १२) राम १३) संगत १४) चटई १७) घमेंड १९) रुक्ष २१) दगा.

सुडोकू क्र. २६७१

४			
	२		
		३	
			१

कसे सोडवाल सुडोकू?
सुडोकू सोडवताना उभ्या आणि आडव्या चार कॉलममध्ये एक ते चार हे अंक उभे किंवा आडवे असे बसवा की ते एका सरळ रेषेत एकदाच आले पाहिजेत.

उत्तर क्र. २६७०

४	३	२	१
१	२	३	४
२	१	४	३
३	४	१	२